# मनःशांतीसाठी सनातन शिक्षणाची गरज

## आध्यात्मिक गुरू गौरांग दास : भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर येथे मार्गदर्शन

**सकाळ वृत्तसेवा**

नागपूर, ता. ३ : आधुनिक शिक्षा पद्धती आम्हाला बाह्य गोष्टींशी लढण्याचे धडे देते. मात्र आंतरिक युद्धावर विजय मिळवण्याचे शिक्षण देणेच बंद झाले. परिणामी आत्महत्येसारख्या घटना घडत आहेत. त्यामुळे आजच्या आधुनिक शिक्षणाला आता सनातन शिक्षण पद्धतीची जोड देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आध्यात्मिक गुरू गौरांग दास यांनी केले.

भारतीय व्यवस्थापन संस्था नागपूर येथे मार्गदर्शन करताना ते बोलत होते. गुरू गौरांग दास म्हणाले की, आधुनिक शिक्षण पद्धती ही जगातील बाह्य शक्तीवर विजय मिळवण्याचे ज्ञान देते. त्यासाठी ती सक्षम आहे. मात्र, आंतरिक युद्धावर विजय मिळवायचे असेल तर आधुनिक शिक्षण पद्धती आणि सनातन शिक्षण पद्धतीमध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे. प्रत्येक धर्मग्रंथांमध्ये आंतरिक शांतीचा संदेश दिला असून त्याचे शिक्षण देणे आवश्यक आहे. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन सगळ्याच धर्मांनी आध्यात्मिक शिक्षणावर भर दिला आहे. सर्वच धर्मग्रंथांमध्ये मनशांतीचा



मार्ग सांगितला आहे. अशा शिक्षणाची आज विद्यार्थ्यांना नितांत आवश्यकता आहे, असेही गौरांग दास म्हणाले. यावेळी आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भिमराया मेत्री उपस्थित होते.

### मंदिरातून शरीर, आत्मा, मनाचा मेळ

आपल्या देशात मंदिरांची आवश्यकता काय? असा प्रश्न नेहमीच केला जातो किंवा मंदिरांवरून अनेकदा वादही निर्माण होतात. भारतात आज २० लाख मंदिरे आहेत. हे मंदिरे मानसिक आरोग्य सुधारण्याचे फार मोठे काम करतात. शरीर, मन आणि आत्मा या तिघांचा मेळ घालण्याचे काम मंदिरं करत आहेत असेही ते म्हणाले. धर्मनिरपेक्ष देश असल्याने धार्मिक शिक्षणाची आवश्यकता काय? असाही प्रश्न उपस्थित होतो. मात्र, दैनंदिन जीवनात, समाजात परिवर्तन घडवायचे असेल, आंतरिक शांती हवी असेल तर धार्मिक शिक्षणच आंतरिक ऊर्जा निर्माण करू शकेल, असेही गौरांग दास यांनी सांगितले.